**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक १५ जून २०२५**

**ठळक बातम्या**

- **विद्यार्थ्यांसाठी एसटी महामंडळाची उद्यापासून एसटी पास थेट तुमच्या शाळेत ही विशेष मोहीम सुरू.**
- **पुण्यातील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला; २५ ते ३० पर्यटक बुडाल्याची भीती.**
- **महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते नागपूरच्या मिहान प्रकल्पांतर्गत मौजा-खापरी (रेल्वे) गावठाणातील 500 प्रकल्पग्रस्तांना पट्टे वाटप.**
- **उत्तराखंडमध्ये हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या अपघातात सात जणांचा मृत्यू, मृतांमध्ये यवतमाळच्या तिघांचा समावेश.**

**आता सविस्तर बातम्या .......**

एसटी बस पासेस

एसटी बसने प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उद्यापासून एसटी महामंडळ “एसटी पास थेट तुमच्या शाळेत” ही विशेष मोहीम राबवणार आहे. या मोहिमेतून विद्यार्थ्यांना एसटीचे पास त्यांच्या शिक्षणसंस्थांमधून वितरीत केले जाणार आहेत.  परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला तसे निर्देश दिले आहेत. शासनाकडून विद्यार्थ्यांना मिळणारी सवलत तसंच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेंतर्गत विद्यार्थीनींना दिले जाणारे मोफत प्रवासाचे पास त्यांना एसटी आगारातून घ्यावे लागत होते.  परंतु आता शिक्षण संस्थानी दिलेल्या माहितीप्रमाणे हे पास आता एसटी महामंडळाकडून थेट संस्थांकडे येतील आणि विद्यार्थ्यांना आपापल्या संस्थांमधून ते घेता येतील. त्यासाठी सर्व शाळा महाविद्यालयांनी आपल्या संस्थेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवावी अशी सूचना  एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी शिक्षणसंस्थांना केली आहे.

पूल दुर्घटना

पुण्याच्या मावळ तालुक्यातील कुंडमळा येथे आज रविवारी इंद्रायणी नदीवरील जुना पूल कोसळल्याची घटना घडली आहे. या घटनेत २५ ते ३० पर्यटक नदीत बुडाल्याची भीती व्यक्त करण्यात येत असल्याची माहिती हिदुस्थान समाचार वृत्तसंस्थेने दिली असून, ही घटना तळेगाव दाभाडे शहराच्या लगत असलेल्या प्रसिद्ध पर्यटनस्थळ कुंडमळा येथे घडली. रविवार असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी होती. याच गर्दीत काही पर्यटक पुलावर थांबले असताना अचानक पूल कोसळला आणि अनेक जण थेट नदीत पडले. प्राथमिक माहितीनुसार, २५ ते ३० पर्यटक नदीत बुडाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यादुर्घटनेवर नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलतांना प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

***आता मी विभागीय आयुक्त, तहसीलदार आणि पोलीस कमिशनर यांच्याशी बोललो आहे. आता प्राथमिक माहिती एवढीच आहे की हा पूल तुटलेला आहे. त्याच्यामध्ये काही लोक जखमी झालेत त्या जखमींना हॉस्पिटलमध्ये नेले आहे. आणि त्यासोबत काही लोकं अडकलेले आहेत. त्यांच्याकरता एनडीआरएफ ची टीम त्या ठिकाणी पोहोचते आहे त्यांना रेस्क्यू करण्याकरता काही लोक वाहून गेल्याची शक्यता आहे, अजून त्या संदर्भातल पूर्ण कन्फर्मेशन मिळालेलं नाही किंवा कॅजुअल्टी च्या संदर्भातल पूर्ण कन्फर्मेशन मिळाल नाही त्यामुळे या क्षणाला त्याबद्दल बोलणं हे योग्य ठरणार नाही. पूर्ण माहिती याची मिळाल्यानंतर याच्यावर आपल्याला माहिती देता येईल, आता प्रशासन तातळीने सगळी मोबिलायझेशन करून आणि लोकांना कसा दिलासा देता येईल अशा प्रकारचा प्रयत्न चाललेला आहे.***

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस, ग्रामस्थ आणि आपदा मित्र यांनी घटनास्थळी धाव घेतली असून, बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. दोन दिवसांपासून मावळ परिसरात मुसळधार पाऊस पडत आहे. पाण्याचा प्रवाह प्रचंड वेगवान असून बचावकार्यात अडथळे येत आहेत.

आषाढी एकादशी

आषाढी एकादशी सोहळा येत्या सहा जुलै रोजी होत असून २६ जून ते दहा जुलै असा यात्रा कालावधी असेल. श्री विठ्ठल- रुक्मिणीच्या दर्शनासाठी सर्व मानाच्या

आणि अन्य पालख्यांचं त्यांच्या नियोजित तिथीप्रमाणं पंढरपूरकडे प्रयाण होत आहे. त्या अनुषंगानं एकंदर व्यवस्थेबाबत राज्य सरकारतर्फे विशेष आढावा घेण्यात येत आहे. यंदाच्या आषाढी वारीसाठी मानाच्या दहा पालख्यांसोबतच्या अकराशेहून जास्त दिंड्यांना प्रती दिंडी वीस हजार रुपये याप्रमाणे अनुदान देण्याचा शासन निर्णयही काल जारी झाला आहे.

जनसंपर्क कार्यक्रम

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपुर येथील जनसंपर्क कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. या कार्यक्रमादरम्यान विविध सामाजिक घटकांनी गडकरी यांची भेट घेऊन आपल्या अडचणी, समस्या आणि मागण्या मांडल्या. दिव्यांग बांधवांनी आपल्या समस्या मांडण्यासाठी तसेच सुविधा मिळवण्यासाठी निवेदन दिले. काहींना कृत्रिम अवयव देण्याचे निर्देश गडकरी यांनी अधिकाऱ्यांना दिले. अनेक वृद्ध नागरिकांनी राज्य व केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा गडकरी यांच्या सहाय्यामुळे हृदयशस्त्रक्रिया यशस्वी झालेल्या काही रुग्णांनी खास त्यांची भेट घेऊन आभार मानले. गडकरी यांनी या रुग्णांशी संवाद साधत त्यांना पुन्हा नवजीवन मिळाल्याचे समाधान व्यक्त केले.

इस्रो

उत्तर प्रदेशात कुशीनगर इथं 'इस्रो', अर्थात, भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं रॉकेट प्रक्षेपण चाचणी यशस्वीपणे पार पाडली. उत्तर प्रदेशातून झालेलं हे पहिलंच प्रक्षेपण असल्यानं या चाचणीला ऐतिहासिक महत्त्व होतं. 'थ्रस्ट टेक इंडिया लिमिलेड' या कंपनीसोबत 'इस्रो'नं केलेल्या या चाचणी दरम्यान रॉकेट प्रक्षेपण चाचणी दरम्यान, प्रक्षेपित केलेलं अंतराळयान १ पूर्णांक १ दशांश किमी उंचीवर गेलं. त्यानंतर, एक लहान उपग्रह बाहेर आला आणि तो ५ मीटर खाली येताच, त्याचं पॅराशूट सक्रिय झालं आणि उपग्रह जमिनीवर ४०० मीटरच्या आत आला. १५ किलो वजनाचं रॉकेटही पॅराशूटच्या मदतीनं सुरक्षितपणे उतरलं.

खापरी रेल्वे

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहचविण्यासाठी राज्यशासन कटीबद्ध असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात लोकाभिमुख, गतिशील व पारदर्शीपणे कार्य सुरू आहे. घरकुलापासून कोणीही वंचित राहू नये, अशी

शासनाची भूमिका असल्याचे सांगून मिहान प्रकल्पग्रस्त खापरीसह चार गावांतील शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत पुनर्वसनाचा लाभ पोहोचवल्याचे आज महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. त्यांच्या हस्ते मिहान प्रकल्पांतर्गत नागपूर ग्रामीणच्या मौजा-खापरी(रेल्वे)गावठाणातील प्रकल्पग्रस्तांना प्रातिनिधिक पट्टे वाटप करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान तथा 100 दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय आणि महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने मिहान येथील पुनर्वसीत अभिन्यासातील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात आयोजित मौजा खापरी (रेल्वे) येथील पात्र 500 प्रकल्पग्रस्तांना महसूलमंत्री बावनकुळे यांच्या उपस्थितीत पट्टे वाटप करण्यात आले. यावेळी बावनकुळे म्हणाले, गेल्या 15 वर्षांपासून प्रतिक्षेत असलेल्या मिहान प्रकल्पग्रस्तांचे राज्यशासनाने पुनर्वसन करुन त्यांना न्याय मिळवून दिला आहे.

उत्तराखंड विमान अपघात

उत्तराखंडमध्ये केदारनाथ परिसरात असलेल्या गौरीकुंड खार्क या डोंगराळ भागात आज सकाळी खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर झाडाला धडकून झालेल्या अपघातात सहा यात्रेकरू आणि पायलटसह सात जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये यवतमाळच्या वणी इथल्या जयस्वाल कुटुंबातल्या तीन जणांचा समावेश आहे. ट्रान्सपोर्ट व्यावसायिक असलेले राजकुमार जायस्वाल, त्यांची पत्नी श्रद्धा आणि दोन वर्षीय मुलगी काशी अशी मृतांची नावे आहे. 12 जूनला राजकुमार सहकुटुंब व काही नातेवाईकांसह बाबा केदारनाथ यांच्या दर्शनासाठी वणी येथून रवाना झाले होते. दरम्यान आज त्यांच्या दुःखद निधनाची वार्ता वणीत पोहोचली. हे हेलिकॉप्टर केदारनाथहून गुप्तकाशीला जात होतं. घटनेची माहिती मिळताच, बचाव पथकं घटनास्थळी रवाना झाली आणि मदत आणि बचाव कार्याला सुरूवात झआली. ‘एसडीआरएफ’, अर्थात, ‘राज्य आपत्ती निवारण दला’नं दिलेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त हेलिकॉप्टर पूर्णपणे जळलं असून सर्व मृतदेह बाहेर काढले आहेत. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. ‘विमान अपघात तपास विभाग’ या अपघाताची चौकशी करणार आहे. धामी यांनी हेलिकॉप्टर सेवा दोन दिवसांसाठी स्थगित करायचे आदेश दिले आहेत.

रानटी हत्ती

चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यातील जतलापूर येथील मारोती कवडू मसराम या गावकऱ्याचा रानटी हत्तीच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. रविवारी सकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास ही घटना घडली. सकाळी सहा वाजताच्या सुमारास शौचासाठी जंगलात गेलेल्या मारोती मसराम या गावकऱ्यावर हत्तीने हल्ला केला. यात ते जागीच ठार झाले. ओदिशावरुन छत्तीसगडमार्गे गडचिरोली जिल्ह्यात दाखल झालेले हत्ती गेल्या दोन वर्षांपासून गडचिरोली जिल्ह्यातच तळ ठोकून आहेत.

हवामान

हवामान! संपूर्ण विदर्भात पुढील चार दिवस तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह तसेच वादळी वाऱ्यासह हलक्यातील मध्यम पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. आज सर्वात जास्त तापमानाची नोंद वर्धा येथे 40 पुर्णांक 4 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली असून नागपूरचे तापमान 39 पुर्णांक 4 अंश सेल्सिअस होते. पुढील एका तासात बुलढाणा अकोला अमरावती वर्धा नागपूर गोंदिया या ठिकाणी विजेच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

*****